

बिगरशेती आखणी मोजणी नकाशा प्रकरण क्रं अतितातडी मो र क्रं . १५/२० मोजणी दिनांक . १२/११/२०२०

**DEMARCATED** EDUCATIONAL LAYOUT PLAN ON SY NO 268/1 PT. AT MOUJE - BACHOTI TQ. KANDHAAR & DIST. NANDED

OWNER'S NAME - JYOTI SUNIL DHONDAGE .
( SECRETARY OF SAVITRIBAI PHULE MAHILA VIKAS PRATISTHAN , KANDHAR )

| AREA STATEMENT IN | SQ.MT |
|---|---|
| TOTAL AREA OF LAND | 20000.00 |
| AREA UNDER PLAY GROUND | 8032.50 |
| AREA UNDER ROAD ( A-B-C-D-E-F-A ) | 1899.75 |
| AREA UNDER EDUCATIONAL PURPOSE | 10067.75 |





TOWN PLANNING & VALUATION DEPT. NANDED BR.

Finally recommended for approval as amended in --------- and subject to the conditions mantioned in this office latter No. 1213 dated 4/12/2020

ASSTT. DIRECTOR OF TOWN PLANING, NANDED




SCALE:- 1.500

OWNER'S SIGN.

Ar. Shirish Purohit
(B.Arch. A.I.I.A.)
CA-97/22177
18,Z.P. Shopping Complex,Nanded

ARCHITECT'S SIGN.

**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग**

**शाखा नांदेड**

घोडजकर इमारत,दुसरा माळा, महाराणा प्रताप चौक, गांधीनगर,नांदेड -431605

ईमेल- adtp.nanded@maharashtra.gov.in दूरध्वनी क्र.02462-221567


जा.क्र.अकृषिक/मौ.बाचोटी/ता.कंधार/ग.नं.268/1/ससंनरनां/ 1213 दिनांक:04/12/2020

प्रति,

तहसिलदार,
कंधार.

विषय:- शैक्षणिक प्रयोजनासाठी अंतिम अकृषिक परवानगी मिळणे बाबत.
मौ.बाचोटी ता.कंधार जि. नांदेड गट क्र.268/1 क्षेत्र 2.00 हे.आर.

संदर्भ:- 1. आपले पत्र क्र.2012/अ/जमा-1/अकृषिक/सिआर-07, दि.06.08.2012
2. या कार्यालयाचे पत्र क्र.09, दि.02.01.2013
3. सचिव,सावित्रीबाई फुले महिला विकास प्रतिष्ठाण,कंधार यांचे पत्र दि.04.12.2020.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र.1 अन्वये विषयांकित जमिनीचे शैक्षणिक प्रयोजनासाठी अकृषिक वापरास परवानगी बाबत प्रस्ताव प्राप्त झाला असता, या कार्यालयाने संदर्भित पत्र क्र.2 अन्वये शैक्षणिक वापरासाठीचे 2.00 हे.आर.क्षेत्रफळाच्या अभिन्यासास काही अटीवर, सिमांकनासाठी तत्वत: मंजुरीची शिफारस केली. आता संदर्भित पत्र क्र.3 अन्वये उपअधिक्षक,भुमी अभिलेख,कंधार यांचा सदर जागेचा सिमांकित मोजणी नकाशा तसेच सिमांकित अभिन्यास नकाशे व इतर संबंधित कागदपत्रे सादर करुन अंतिम मंजुरी अपेक्षिली आहे. त्यानुसार सादर केलेले सिमांकित अभिन्यास नकाशांस खालील अटींस अधीन राहून शैक्षणिक वापरासाठीची अंतिम मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे.

1. अभिन्यासातील खेळाचे मैदान/खुली जागा या व्यतिरिक्त शैक्षणिक वापरासाठी दर्शविलेल्या भुखंडाचा उपयोग शैक्षणिक वापरासाठीची करण्यात यावा.
2. अकृषीक परवानगी देण्यापुर्वी जागेच्या मालकी हक्क, कुळ, वतन, इनाम, आदिवासीबाबत व विद्यमान रस्त्यांबाबत महसुल विभागाकडून योग्य ती शहानिशा करण्यात यावी. जागेच्या मालकीबाबत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. भविष्यात उक्त क्षेत्रामध्ये मालकी हक्क अथवा इतर तत्सम बाबींबाबत वाद निर्माण झाल्यास सदरची परवानगी आपोआप रद्द समजण्यात यावी.
3. भविष्यकाळात पुढे अभिन्यासातील भुखंडाचे विभाजन / तुकडे करतांना महसुल विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहिल.
4. अभिन्यासातील कोणत्याही भुखंडात बांधकाम किंवा विकास करतांना मंजुर प्रादेशिक योजना,नांदेड साठी
लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे बांधकाम करण्यात यावे व त्यास महसुल विभाग व या कार्यालयाची पुर्व परवानगी/अभिप्राय घेणे बंधनकारक राहिल.
5. अभिन्यासातील रस्ते नियोजन प्राधिकरणास विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार रु.1/-नाममात्र किंमतीस नोंदणी दस्तऐवजाव्दारे हस्तांतरीत करण्यात यावे तसेच रस्ता

रुंदीकरणाखालील क्षेत्र विनामोबदला हस्तांतरण करणे बंधनकारक राहील. त्यासाठी कोणताही मावेजा मिळणार नाही.

6. प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी/चुकीची आढळुन आल्यास सदरची परवानगी आपोआप रद्द समजण्यात यावी.
7. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.आरबीडी-1081/871/रस्ते-7, दि.9.3.2001 तसेच त्यात शासनाने केलेल्या सुधारणा विचारात घेऊन त्यानुसार नियंत्रण रेषा, इ. चे पालन करणे आवश्यक आहे.
8. सरदच्या अभिन्यासातील शैक्षणिक भुखंडामध्ये फक्त शैक्षणिक वापर अनुज्ञेय राहिल,
9. जागेवर खडीकरण रस्ते,नाली विद्युत व्यवस्था करणे बंधनकारक राहिल.
10. संदर्भ क्र.02 च्या पत्रातील सर्व अटींचे पालन करणे बंधनकारक राहील.
11. जागेवरील विद्युत लाईनचे स्थलांतर करणे बंधनकारक राहिल.
12. शासन,नगर विभाग विभागाची अधिसुचना क्र.टिपीएस-1814/सं/प्र.क्र.120/14/नवि-13, दि.05. 06. 2015 नुसार उक्त जागेत शैक्षणिक वापर अनुज्ञेय करावयाचा झाल्यास तो 'पब्लीक चॅरिटेबल ट्रस्ट' तर्फे चालविला जाणार असणे आवश्यक आहे. सबब, सदर बाबतीत आपले स्तरावरुन आवश्यक ती खातरजमा करुनच पुढील कार्यवाही करण्यात यावी.

- अंतिम मंजुरीची शिफारस करण्यात येत असलेला अभिन्यास नकाशा सोबत जोडला आहे.

सहपत्र :- नकाशा (तीन प्रतीत)

(प.ला.आलूरकर)
सहाय्यक संचालक, नगर रचना
नांदेड.